हेतून असे तरतीस्थान आले आहे की, विभागामधील वर्ग-४ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने बढतीसाठी निहित केलेल्या प्रमाणानुसार बढतीने भरावयाची रिक्त पदे भरण्यासाठी सर्व विभागांमध्ये होणारी कार्यवाही सामूहिकरित्या व कालबद्ध कार्यक्रमानुसार पूर्ण करावी, याकरिता सर्व विभागांमध्ये समांतर करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक या कार्यालयामार्फत पुढील प्रमाणे आखून देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १] विविध पदांमधील रिक्त असलेल्या पदांची सामान्य आदेश ५०३ मध्ये निहित केलेल्या प्रमाणानुसार खात्यामार्फत बढतीसाठी परिगणना करणे व अनुशेष/आरक्षण, रिक्त जागा यांचा विचार करून परिपत्रकीय सूचना प्रसारित करणे. | :- ऑगस्ट - पहिला आठवडा |
| २] बढतीने भरावयाच्या रिक्त जागांसाठी इच्छुक उमेदवार-अर्ज मागवून प्राप्त झालेल्या अर्जदार-उमेदवारांची नावांची यादी जाहीर करणे. | :- १५ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान. |
| ३] वरील अनु. क्र. २ येथे नमूद केल्याप्रमाणे पात्र ठरलेल्या उमेदवारांना परीक्षापूर्व प्रशिक्षण देणे | :- ३१ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत. |
| ४] लेखी/व्यवसाय चाचणी परीक्षा प्रादेशिक कचेरीने/मध्यवर्ती कार्यशाळेने आयोजित करणे. | :- १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर. |
| ५] लेखी/व्यवसाय चाचणी परीक्षेचा निकाल प्रादेशिक/मध्यवर्ती कार्यशाळा कचेरीने जाहीर करणे. | :- ऑक्टोबर - पहिला आठवडा. |
| ६] बढतीच्या रिक्त पदी पात्र उमेदवारांना ज्येष्ठतेनुसार आणि मागासवर्गीयांसाठी ५० बिंदू नामावलीनुसार अनुशेष/आरक्षण विचारात घेऊन नेमणुका देणे. | :- ऑक्टोबर - दुसरा आठवडा. |

वरील प्रमाणे आखलेल्या कार्यक्रमानुसार सर्व विभागांनी खात्यामार्फत बढतीने भरावयाची रिक्त पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ३१ डिसेंबर पर्यंत या कार्यालयास पाठवावा.

[signature]

उप महा व्यवस्थापक [प. व औ. सं.]

पां६५२५